नि.फौ.ख.क्रं. ४९/२०१८

सरकार –वि– दयाराम व इतर

नि.क्र. ८१

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – अर्जुन रामकृष्ण गिते,

वय. ४० वर्षे, व्यवसाय – शेती,

राहणार – शेगाव, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</u>**

१. दि. ०७.१२.२०१७ रोजी रोकडीया नगर येथील भाऊराव देशमुख येथे माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा झाला नव्हता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी पंच क्र.२ म्हणून सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. त्याला सहीपुरता **<u>नि.क्र.८२</u>** देण्यात येते. दि.०८.१२.२०१७ रोजी माझ्या समक्ष निवेदन पंचनामा झाला नव्हता व आरोपीकडून निवेदन पंचनाम्यानुसार काही जप्त झाले नव्हते. आता मला निवेदन पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी पंच क्र.२ म्हणून दोन सह्या आहेत. त्यातील मजकूर मला माहिती नाही. त्याला सहीपुरता **<u>नि.क्र.८३ व ८४</u>** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे, सरकारी वकीलांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली असता त्यांना परवानगी देण्यात आली.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.०७.१२.२०१७ रोजी रोकडीया नगर येथील भाऊराव देशमुख चौकात मी घटनास्थळ पंचनाम्यासाठी पंच म्हणून गेलो होतो व माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर मला वाचून दाखविण्यात आला व मी त्यावर वाचून समजून सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि.०८.१२.२०१७ रोजी आरोपी गौरव घुले याने गुन्ह्यात वापरण्यात आलेला लोखंडी पाईप मी माझ्या घराच्या बाजुला असलेल्या गोठ्याच्या टिनावर ठेवलेला आहे व मी तो काढून देतो असे माझ्या समक्ष सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, गौरव घुले याने दिलेल्या बयाणानुसार मी गौरव घुले याच्या घरी गेलो होते व गौरव याने त्याच्या गोठ्याच्या वर असलेला लोखंडी पाईप माझ्या समक्ष पोलीसांना काढून दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यानुसार माझ्या समक्ष जप्ती पंचनामा तयार करण्यात आला व मी त्यावर वाचून समजून सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मेमोरंडम पंचनामा व घटनास्थळ पंचनाम्याबाबत पोलीसांनी माझे बयाण नोदविले होते. आता माझ्या बयाणातील अधोरेखांकीत भाग–अ दाखविण्यात आला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणेच पोलीसांनी माझ्या

जबाबातील अधोरेखांकीत भाग–अ लिहिलेला आहे. मी सर्व आरोपींना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सर्व आरोपींना ओळखत असल्यामुळे त्यांना शिक्षेपासून वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपींतर्फे श्री. ए. एस. बनारसे वकील यांनी नाकारला.**

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (एन. डी. मेश्राम) | (एन. डी. मेश्राम) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि. ०६.०१.२०२६ | दि. ०६.०१.२०२६ |